

जगाला शांतीचा संदेश देणाऱ्या प.पु.गौतम बुध्दांच्या जयंतीनिमित्त त्यांना त्रीवार अभिवादन!

*******

सर्व देशबांधवांना बुध्द पोर्णिमेनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

अभिवादनकर्ते / शुभेच्छूक

एन.सी.आय.बी.अधिकारी व
खबर से हकीकत तक वृत्तपत्र, परिवार


# खबर से हकिकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK

● WEBSITE : https://khabarsehakikattak.in
● Email : shirishkumarsherkhane@gmail.com

संपादक : शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो.९०४९८४४४१२

कार्यकारी संपादक : ॲड.चंद्रशेखर धोत्रे, मुंबई

लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष १ ले. | अंक ५० वा. | सोमवार दि.२० ते २६ मे २०२४ | RNI No. : MAHMAR/2023/86200 | किंमत २ रूपये | पाने : ४








# निवडणूक आयोगाने जप्त केले ८ हजार ८८९ कोटी

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीदरम्यान पाचव्या टप्प्यापर्यंत निवडणूक आयोगाने मोठी कारवाई केली आहे. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणूक आयोगाने जवळपास ८ हजार ८८९ कोटींचे घबाड जप्त केले आहे. यामध्ये रोकडसह अवैध वस्तूंचा समावेश आहे. निवडणूक आयोगाकडून याबाबतची माहिती जाहीर करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या मते हा आकडा लवकरच ९ हजार कोटींचा टप्पा पार करणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार निवडणूक स्वच्छ आणि चांगल्या वातावरणात पार पडाव्यात, यासाठी विविध संस्थांनी आतापर्यंत ८ हजार ८८९ कोटींची मालमत्ता जप्त केली आहे. गेल्या ३ टप्प्यांतील प्रचार जोमात सुरू आहे. प्रलोभनाद्वारे मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या प्रयत्नांवर कारवाई करण्यासाठी निवडणूक आयोगाने सीईओंना निर्देश दिले आहेत.

**४५ टक्के हिस्सा ड्रग्जशी संबंधित**

**जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये ४५ टक्के हिस्सा ड्रग्जच्या रुपाने जप्त करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने जप्त केलेल्या ८ हजार ८८९ कोटींचे घबाड जप्त केले. त्यापैकी ३९५८ कोटी रुपयांची मालमत्ता ड्रग्जसंबंधीची आहे. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार सातत्याने पाठपुरावा, जिल्ह्यांचा सातत्यपूर्ण आढावा आणि यंत्रणांच्या दक्षतेमुळे १ मार्चपासून आतापर्यंत एवढी मोठी रक्कम जप्त केली.**



## महाराष्ट्रात मान्सून सहा जूनला हजेरी लावणार

पुणे : नैऋत्य मोसमी वा-याच्या (मॉन्सून) प्रगतीसाठी सध्या हवामानातील आवश्यक घटक पूरक आहेत. त्यामुळे यंदाच्या मॉन्सूनची प्रगती वेगाने सुरू असून तळकोकणात तो सहा जूनला हजेरी लावेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मान्सून दक्षिण अंदमानच्या समुद्रात दाखल होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने यापूर्वी वर्तविली आहे. मॉन्सूनचे देशातील महाद्वार असलेल्या **(पान २ वर)**

## एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाला लागली आग; १८५ प्रवाशांचे वाचले प्राण

नवी दिल्ली : एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाने शनिवारी रात्री उड्डाण केल्यानंतर लगेचच एका इंजिनला आग लागल्याने बंगळुरू विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. यामुळे १८५ प्रवाशांचे प्राण वाचले आणि सर्व प्रवाशांना विमानातून सुखरूप खाली उतरवण्यात आले. विमान बंगळुरूहून कोचीला जात होते. सूत्रांनी सांगितले की, विमानाने उड्डाण केल्यानंतर लगेचच क्रू मेंबर्सनी एटीसीला इंजिनला आग लागल्याची माहिती दिली.



एअर इंडिया एक्स्प्रेसच्या प्रवक्त-याने सांगितले की, बंगळुरू-कोची विमानाने उड्डाण करताच उजव्या इंजिनला आग लागल्याचे निदर्शनात आले. यानंतर विमान परत उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला आणि शनिवारी रात्री विमान बंगळुरू विमानतळावर सुरक्षितपणे उतरवण्यात आले आणि सर्व प्रवाशांना सुखरूप विमानातून बाहेर उतरवण्यात आले.

दरम्यान, या दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नसल्याचे एअर इंडिया एक्स्प्रेसच्या प्रवक्त-यानी सांगितले. यानंतर प्रवाशांना दुस-या विमानाने प्रवासाची व्यवस्था करून देण्यात आली. यासोबतच आग कोणत्या कारणामुळे लागली याची सखोल चौकशी करण्यात येईल, अशी माहितीही प्रवक्त-यानी दिली.

# श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन २ जुन पासून होणार सुरु

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संवर्धन व जीर्णोद्धाराचे काम पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून करण्यात येत आहे. श्री विठ्ठल मंदिर व रुक्मिणी मंदिरातील गाभारा संवर्धनाचे काम १५ मार्चपासून सुरू करण्यात आले असून, हे काम पूर्णत्वास येत आहे. भाविकांसाठी २ जूनपासून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पदस्पर्श दर्शन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह. भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संवर्धन कामांबाबत तसेच आषाढी यात्रापूर्व नियोजनाबाबत शनिवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस सदस्या शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख-जळगावकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे, ह.भ.प. शिवाजी मोरे, तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, ठेकेदार रमेश येवले व सर्व खाते प्रमुख उपस्थित होते. यावेळी सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, श्री विठ्ठल गाभारा व रुक्मिणी गाभारा येथील संवर्धनाचे काम करतेवेळी मूर्तीच्या संरक्षणास कुठल्याही प्रकारची बाधा येणार नाही, याची दक्षता घेऊन तसेच मूर्ती संरक्षणास प्राधान्य देऊन कामास सुरुवात करण्यात आली.

**आषाढीनिमित्त २४ तास दर्शन**

**आषाढी यात्रा १७ जुलै रोजी होत असून, आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. दर्शन रांग, पत्रा शेड, दर्शन मंडप या ठिकाणी भाविकांना अधिकच्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. यासाठी दोन हजार कर्मचारी व स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात येणार आहे. या यात्रेला भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन, ७ ते २६ जुलैदरम्यान २४ तास दर्शन सुरू करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.**

# आरटीई अंतर्गत पालकांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ३१ मे पर्यंत मुदत

छत्रपती संभाजीनगर : उच्च न्यायालयाच्या स्थगितीनंतर शिक्षण विभागाने आता आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश प्रक्रिया जुन्या पद्धतीने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. आरटीई पोर्टलवरील ऑनलाईन अर्ज भरण्याची बंद असलेली लिंक सुरू करण्यात आली आहे. पालकांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ३१ मेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.





यंदा शासनाने आरटीईच्या नियमात बदल करुन आरटीईच्या शाळांमध्ये विना अनुदानित इंग्रजी शाळांबरोबरच अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व स्वयंअर्थसहाय्यित शाळा यांचाही समावेश केला होता. तसेच विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून १ किलोमीटरच्या परिघात सरकारी किंवा खासगी विनाअनुदानित शाळा असेल तर त्याला विनाअनुदानित शाळेत आरटीईअंतर्गत प्रवेश दिला जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. परंतु याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानुसार न्यायालयाने या नवीन नियमांसंदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेला स्थगिती दिली आहे. यामुळे जुन्याच पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे.

**छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील ५७३ शाळांमध्ये मिळणार मोफत प्रवेश**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ५७३ शाळांमध्ये एकूण ४४४१ जागांवर मोफत प्रवेश दिले जाणार आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आरटीईसाठी अनुदानित आणि सरकारीसह सर्व प्रकारच्या शाळांमध्ये ३६ हजार जागांवर मोफत प्रवेश दिले जाणार होते. आता मात्र, सरकारी आणि अनुदानित शाळा यामधून वगळण्यात आल्या आहेत. नव्या प्रक्रियेत केवळ विनाअनुदानित इंग्रजी शाळांचीच नोंदणी करण्यात आली आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ५७३ शाळांमध्ये ४४४१ जागांवर मोफत प्रवेश दिले जाणार आहे.


# मुख्याध्यापक गणेश सावळकर यांना रोटरी क्लब लातूरच्यावतीने जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



लातूर : रोटरी क्लब लातूर यांच्या वतीने दिला जाणारा नॅशनल बिल्डर अवॉर्ड जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा तालुका रेणापूर शाळेचे मुख्याध्यापक गणेश राणबा सावळकर यांना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य नागोराव कुंभार, ॲड.जांबुवंतराव सोनकवडे यांच्याहस्ते सचिव रो महेंद्र जोशी, प्रकल्प प्रमुख प्रविण होळीकर समस्त कक्कय्या महासंघाचे लातूर जिल्हाध्यक्ष श्रीमंत कावळे यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सहशिक्षक जाकीर शेख, रो बस्वराज उटगे, रो.सतिश बोरा, रो.सुरेश पेन्सलवार, रो. सुधाकर कोडगिरे, रो.राजकुमार गिरवलकर, रो.डॉ.सौ अर्चना लड्डा, रो.सौ.अनंदा कोचेटा, रो.सौ.कौशल्यादेवी सोनकवडे, विजय व्हसाळे, विजयकुमार रसाळ व इतर मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# हरित पालखी सोहळ्यासाठी सूक्ष्म नियोजन होणार

पुणे : आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी पाणी, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, रस्ते, रस्ता सुरक्षा, आरोग्य सुविधा आदी सर्व सोयी-सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासह सुरक्षित आणि हरित पालखी सोहळ्यासाठी सर्व यंत्रणांनी आतापासून सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थान आणि संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान पालखी सोहळ्याबाबत पूर्वतयारी आढावा बैठक डॉ. दिवसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी



अधिकारी संतोष पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम आदी उपस्थित होते. यंदा वेळेवर पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला असल्याचे सांगून डॉ. दिवसे म्हणाले की, पावसाची स्थिती लक्षात घेऊन आवश्यक सुविधा करण्यात याव्यात. पावसाळा लक्षात घेता स्वच्छता आणि आरोग्याचा परस्पर संबंध असल्याने तात्पुरत्या शौचालयाच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे. स्वच्छतेच्या नियोजनासाठी स्वतंत्र नियंत्रण अधिका-यांची नियुक्ती करावी.

पालखी सोहळा जगातील सर्वात शिस्तबद्ध असणारा सोहळा आहे. आपण अशा सोहळ्याचे भागीदार आहोत, या भावनेने सोहळ्यासाठी आपले योगदान द्यावे. पालखीसाठी टँकरने पाणीपुरवठा होणा-या सर्व स्त्रोतांची तपासणी करावी. आवश्यक ती निर्जंतुकीकरणाची औषधे, दवाखान्यांमध्ये औषधे उपलब्ध ठेवावीत. पाणीपुरवठ्याचे टँकर आणि शौचालयांच्या संख्येत वाढ कण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. पालखीच्या रस्त्यावर अतिक्रमणे असल्यास ती तात्काळ काढून टाकण्यात यावीत. आपत्कालीन व्यवस्थेसाठी नगरपालिकेकडील लायटिंग टॉवरचा **(पान २ वर)**

# पानगाव ते खरोळा फाटा राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले

पानगाव(प्रतिनिधी): रेणापूर तालुक्यातील पानगाव ते खरोळा फाटा उमरगा-खामगाव राष्ट्रीय महामार्ग कामाला सन २०१८ मध्ये मंजुरी मिळाली खरोळा फाटा ते पानगांव हा केवळ १४ कि.मी. अंतराचा महामार्ग मागील पाच वर्षांपासून रखडलेला होता. अनेक अंदोलने झाली परंतु रस्ता होऊ शकला नव्हता परंतु दि. ११ डिसेंबर रोजी पानगाव ते खरोळा फाटा रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला पानगाव पासून सुरुवात करण्यात आले होते. परंतु काही शेतकल्यांनी काम अडवले होते.

तेंव्हा गुत्तेदाराने रेल्वे स्टेशन ते कारखाना रस्त्याचे पूर्ण करतो म्हणून कामास सुरुवात केली परंतु एक महीना होवून गेला तरी काम बंदच असल्याने रस्त्यावरून जाताना वाहन पुढे गेल्यास मागच्या वाहन धारकाला रस्ताच दिसत नाही. यामुळे पानगावच्या बाजारपेठेत शुकशुकाट दिसत असून बाजारपेठ बंद पडण्याच्या मार्गावर आहे. उमरगा ते खामगाव जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ एच या राष्ट्रीय मार्गाला २०१८ मध्ये मंजुरी मिळाली होती. पानगांव रेल्वेगेट ते खरोळा फाटा हा केवळ १४ कि.मी. इतकाच कधी शेतकऱ्यांच्या मावेजा करीता तर कधी महामार्ग अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे आणि लोक प्रतिनिधीच्या दुर्लक्षामुळे होऊ शकला नाही. दि. २६ डिसेंबर रोजी गावकऱ्यांनी शेवटचा पर्याय म्हणून स्वयंस्फूर्तीने पानगांवच्या व्यापाऱ्यांनी आणि पानगावसह परिसरातील वाडी खेड्याच्या ग्रामपंचायतीने ठराव घेवून व्यापार पेठेसह गाव बंद ठेवून रेणापूर पिपळफाट्यावर झालेल्या रास्ता रोकोला पाठींबा दिला होता. याची दखल घेऊन शासनाने १० मीटर रस्ता तयार करण्याचा निर्णय घेतला आणि ११ डिसेंबर २०२३ रोजी प्रत्यक्ष कामास सुरुवात केली.

संबंधित गुत्तेदाराने पानगाव रेल्वेगेट ते कारखाना पर्यंत खोदकाम केले असल्याने एवढे काम चालू ठेवले गावातुन एक बाजू खोदून भरली व पुलाचे काम एक बाजू पूर्ण केली. दुसरी बाजू खोदून ठेवल्याने अपघाताची भिती आहे तर जिल्हापरीषद शाळा ते कारखाना एक बाजु खड़ी टाकून ठेवल्याने वाहतुकीस अडथळा होत आहे तर समोरुन किंवा पाठीमागून चारचाकी वाहन गेल्यास दुचाकीस्वारास धुळीच्या लोटाने रस्ताच दिसत नसल्याने अपघात होत आहेत तेव्हा किमान रेल्वेगेट ते कारखाना हा खोदलेला तरी रस्ता पूर्ण करावा अन्यथा पावसाळा जवळ आला आहे. तेव्हा पुर्वीचे डांबररोडवरचे खड्डेच बरे होते असे म्हणण्याची वेळ पानगावकरावर येणार आहे तेव्हा संबंधित विभागाने याकडे लक्ष देवून काम सुरु करावे अशी मागणी नागरीक करत आहेत.



**रस्त्या अभावी पानगावची बाजारपेठ बंद पडण्याच्या मार्गावर**

**रेणापूर तालुक्यातील सर्वांत मोठी बाजारपेठ म्हणून पानगावची ओळख आहे. पानगावसह परीसरातील १२ गावचा व्यवहार हा पानगाव बाजारपेठेतून चालतो परंतू पानगावच्या बाजारपेठेत आज रस्त्या अभावी शुकशुकाट दिसत असून सद्या येथील बाजारपेठ बंद पडण्याच्या मार्गावर आहे. अनेक व्यापाऱ्यांनी बँकेचे, खासगी कर्ज घेऊन आपला व्यावसाय थाटला खरा परंतू रस्त्याचे तीन तेरा नऊ आठरा झाल्यामुळे बाहेरून येणारी वाहनांची आणि लोकांची संख्या कमी झाल्यामुळे दररोज लाखो रुपयांची होणारी उलाढाल आज हजार पाचशेवर आली आहे. रस्त्यावर पाणी न टाकल्यामुळे धुळीचे लोट उडत आसल्याने नागरीकांचे व व्यापाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.**

**- गिरीधर मोटाडे,** अध्यक्ष व्यापारी संघटना पानगाव. ता. रेणापूर जि लातूर.

**क्रॉंकीट करण्याच्या प्लॅनटचे काम सुरु आहे**

**पानगाव ते खरोळाफाटा राष्ट्रीय महामार्गांच्या रस्त्याच्या कामाचे काही ठिकाणचे काम न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे पानगाव रेल्वे गेट पासून पुढील ४ कि.मी चे काम सुरु आहे. खडी अंथरुन लेअर टाकून क्रॉफिट करण्याचे काम येत्या पंधरा दिवसांत सुरु होईल. खडी अगोदर अंबरली तर ती खड़ी ईतज ईतर पांगते म्हणून सद्या खडीचे ढीग टाकले आहेत सर्व तयारी करून घेतली आहे. क्रॉकोट प्लॅटचे उभारणीचे काम सुरु आहे. ती पुर्ण होताच खड़ी अंथरून लागलीच कामाला सुरुवात केली जाईल आणि ४ कि.मी. चे काम पूर्ण होईल.**

**- प्रविण सुमंत,** कार्यकारी अभियंता-राष्ट्रीय महामार्ग विभाग लातूर

# संपादकीय....

## बुध्द पोर्णिमेचा उत्सव!

बुद्ध पौर्णिमा, ज्याला बुद्ध जयंती देखील म्हणतात , राजकुमार सिद्धार्थ गौतम यांचा जन्म दर्शवितो, ज्यांना नंतर बुद्ध म्हणून ओळखले गेले आणि त्यांनी बौद्ध धर्माची स्थापना केली. 'पौर्णिमा' या शब्दाचा संस्कृतमध्ये अनुवाद 'पौर्णिमा' असा होतो आणि हिंदू/बौद्ध चंद्र कॅलेंडरमध्ये ' वैशाखी ' महिन्यात पौर्णिमेच्या दिवशी हा सण साजरा केला जातो . 'जयंती' म्हणजे 'वाढदिवस'. हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, महाराष्ट्र, अंदमान आणि निकोबार बुद्ध पौर्णिमा याला बुद्ध जयंती किंवा वेसाक या नावानेही ओळखले जाणारे एक बौद्ध सण आहे . हा सण गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि मृत्यू दर्शवितो आणि संपूर्ण देशभरात तसेच श्रीलंका, इंडोनेशिया, मलेशिया इत्यादी देशांमध्ये बौद्ध समुदाय साजरा करतात. या सणाला विशेष महत्त्व आहे आणि तो मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये ही तारीख वर्षानुवर्षे बदलते आणि ती सामान्यत: वेशाखच्या पौर्णिमेच्या दिवशी साजरी केली जाते. उत्सवाची तारीख सामान्यतः एप्रिल किंवा मे महिन्यात येते. याचे कारण असे की अचूक तारीख आशियाई चंद्र सौर कॅलेंडरवर आधारित आहे. जर लीप वर्ष असेल तर हा सण जून महिन्यात येतो.

**बुद्ध पौर्णिमा म्हणजे काय?**

बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध परंपरेतील एक महत्त्वाचा सण आहे, जो दक्षिण, दक्षिणपूर्व आणि पूर्व आशियामध्ये साजरा केला जातो. हे राजकुमार सिद्धार्थ गौतम यांच्या जन्माचे स्मरण करते, जे नंतर गौतम बुद्ध म्हणून ओळखले गेले आणि बौद्ध धर्माची स्थापना केली. बौद्ध परंपरा आणि पुरातत्व शोधानुसार, गौतम बुद्ध यांचा जन्म नेपाळमधील लुंबिनी येथे ५६३-४८३ ईसापूर्व सुमारे झाला होता. त्याची आई, राणी माया देवी, हिने त्याला आपल्या वडिलोपार्जित घरी जाताना जन्म दिला, तर त्याचे वडील राजा शुद्धोदन होते. मायादेवी मंदिर, त्याच्या सभोवतालच्या बागांसह आणि अशोक स्तंभ २४९ इउए पूर्वीचा आहे, लुंबिनीमध्ये बुद्धाच्या जन्माचे ठिकाण आहे.

बुद्धाच्या जन्मदिवसाची अचूक तारीख विविध आशियाई प्रदेशांमध्ये पाळल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या चंद्र कॅलेंडरवर अवलंबून असते. श्रीलंकेचे अधिवेशन विशिष्ट वर्ष ठरवत असताना, इतर चंद्र सौर कॅलेंडर भिन्न चंद्र दिवस नियुक्त करू शकतात. परिणामी, बुद्धाचा जन्मदिवस साजरे करणे विशेषत: एप्रिल किंवा मे मध्ये पाश्चात्य ग्रेगोरियन कॅलेंडरवर येते, लीप वर्षांमध्ये बदल घडतात, काहीवेळा जूनपर्यंत वाढतात. संपूर्ण दक्षिण आणि आग्नेय आशियामध्ये, बुद्धाच्या जन्माचे स्मरण वेसाक उत्सवाचा एक भाग म्हणून केले जाते, जे त्यांच्या ज्ञानाचा (पौर्णिमेच्या दिवशी होणारा) आणि त्यांच्या महापरिनिर्वाणाचा देखील सन्मान करते. तथापि, तिबेटी बौद्ध धर्म बुद्धाच्या जन्माला, ४थ्या महिन्याच्या ७ व्या दिवशी साजरा केला जाणारा, सागा दावा दुचेन, त्याच्या ज्ञान आणि महापरिनिर्वाणासाठी समर्पित वार्षिक उत्सव, ४थ्या महिन्याच्या १५ व्या दिवशी साजरा केला जाणारा, वेगळे करतो. पूर्व आशियामध्ये, विशेषत: व्हिएतनाम आणि फिलीपिन्समध्ये, बुद्धाच्या आत्मज्ञान आणि मृत्यूला समर्पित सुट्ट्या आहेत.

भारतात बुद्ध पौर्णिमेची सार्वजनिक सुट्टी सर्वप्रथम बी.आर. आंबेडकर यांनी कायदा आणि न्याय मंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात सुरू केली होती. सिक्कीम, लडाख, अरुणाचल प्रदेश, बोधगया, लाहौल आणि स्पीती जिल्हा, किन्नौर, आणि कालिम्पाँग, दार्जिलिंग आणि कुर्सिओंगसह उत्तर बंगालच्या विविध भागांमध्ये ही सुट्टी ठळकपणे पाळली जाते. याशिवाय, भारताच्या ७७% बौद्ध लोकसंख्येचे घर असलेल्या महाराष्ट्रात, तसेच भारतीय दिनदर्शिकेनुसार देशातील इतर भागातही तो साजरा केला जातो. या प्रसंगी बौद्ध धर्मीय सेवेसारखे विस्तारित बौद्ध सूत्रामध्ये गुंतण्यासाठी विहारांमध्ये जमतात.

गौतम बुद्धांचा जन्म सिद्धार्थ गौतम म्हणून राजा शुद्धोदनाला झाला. तो मोठ्या ऐषारामात वाढला होता. त्याच्या जन्माच्या वेळी असे भाकीत केले गेले होते की राजकुमार पुढे एक महान सम्राट होईल, त्याला बाहेरील जगापासून अलिप्त ठेवण्यात आले जेणेकरून त्याच्यावर धार्मिक जीवनाचा प्रभाव पडू नये. तथापि, वयाच्या २९ व्या वर्षी, राजपुत्राने अधिक जग पाहण्याचा निर्णय घेतला आणि राजवाड्याच्या मैदानातून त्याच्या रथातून सहलीला सुरुवात केली. त्याच्या प्रवासात, त्याने एक वृद्ध माणूस, एक आजारी माणूस आणि एक प्रेत पाहिले. कारण, सिद्धार्थ गौतमाचे वृद्धत्व, आजारपण आणि मृत्यू या दु:खांपासून संरक्षण करण्यात आले होते, त्यामुळे त्यांच्या सारथीला ते काय होते हे स्पष्ट करावे लागले. सहलीच्या शेवटी, त्याला एक साधू दिसला आणि तो त्या माणसाच्या शांत वर्तनाने प्रभावित झाला. म्हणूनच, आजूबाजूला इतके दुःख असूनही तो माणूस इतका शांत कसा असू शकतो हे शोधण्यासाठी त्याने जगात जाण्याचा निर्णय घेतला.

तो राजवाडा सोडून भटक्या तपस्वी झाला. त्यांनी अलारा कलामा आणि उद्रका रामपुत्र यांच्या अंतर्गत औषधांचा अभ्यास केला आणि लवकरच त्यांच्या प्रणालींमध्ये प्रभुत्व मिळवले. तो गूढ अनुभूतीच्या उच्च अवस्थेला पोहोचला पण तो असमाधानी असल्याने तो निर्वाणाच्या शोधात निघाला, जो परम ज्ञानाचा स्तर आहे. तो एका वटवृक्षाखाली बसून आत्मज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करू लागला. एकदा, त्याला ज्ञान प्राप्त झाले, त्याने त्याबद्दल उपदेश केला आणि बौद्ध धर्माची स्थापना केली.

**प्रारंभिक बौद्ध धर्मातील महत्त्वाचे टप्पे**

५६३ ईसा पूर्व: राजकुमार सिद्धार्थ गौतम यांचा जन्म नेपाळमधील लुंबिनी येथे झाला. त्याला नंतर बौद्ध धर्माचे संस्थापक बुद्ध म्हणून ओळखले जाते. ५२८ ईसा पूर्व: बोधगया, बिहार, भारत येथे बोधिवृक्षाखाली ध्यान करताना बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले. हा कार्यक्रम जागरण म्हणून ओळखला जातो. ४८३ ईसा पूर्व: बुद्ध निर्वाण प्राप्त करतात, पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्त होतात आणि गहन ध्यानाच्या अवस्थेत त्यांचे निधन झाले. २६९-२३१ बीसी: बौद्ध धर्माचे संरक्षक, राजा अशोकाच्या कारकिर्दीत, बौद्ध धर्म प्रचार सुरू झाला आणि धर्म संपूर्ण आशियामध्ये पसरला.

**बुद्ध पौर्णिमा साजरी**

उत्सवाच्या दिवशी बुद्धमूर्तींचे पूजन केले जाते तसेच प्रार्थना सभेचे आयोजन केले जाते. भाविक बौद्ध मंदिरांना भेट देतात, बौद्ध धर्मग्रंथांचे पठण करतात आणि धार्मिक चर्चा आणि सामूहिक ध्यानात भाग घेतात. उत्सवाच्या निमित्ताने, बोधगया येथील महाबोधी मंदिराला रंगरंगोटीने सुशोभित केले जाते आणि बोधी वृक्षाखाली विशेष प्रार्थना केली जाते, जिथे गौतम बुद्धांना ज्ञान प्राप्त झाले होते. दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालय लोकांना प्रसंगी भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष पाहू देते. सणाच्या दिवशी तांदूळ आणि दूध वापरून बनवलेली 'खीर' नावाची गोड पदार्थ तयार केली जाते.

**बुद्ध पौर्णिमा कशी साजरी केली जाते?**

अनेक बौद्ध मंदिरे आणि केंद्रे बुद्ध पौर्णिमेला विशेष समारंभ आयोजित करतात. लोक एखाद्या समारंभाला वैयक्तिकरित्या उपस्थित राहतात किंवा पारंपारिक विधी आणि प्रार्थनांमध्ये अक्षरशः भाग घेतात.

# श्री तुळजाभवानीदेवी मंदिरातील ८ कोटी ४५ लाख रुपयांच्या 'दानपेटी घोटाळ्या'चे प्रकरण!

## न्यायालयाने आदेश देऊनही तात्काळ गुन्हे दाखल न केल्यास अवमान याचिका दाखल करणार!

धाराशिव – श्री तुळजाभवानीदेवी मंदिरात ८ कोटी ४५ लाख ९७ हजार रुपयांचा दानपेटी घोटाळा झाला होता. या भ्रष्टाचारात सरकारी अधिकारी गुंतले आहेत, म्हणून प्रशासन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, असे ताशेरे ओढत या घोटाळ्याचा तपास बंद करण्याचा शासनाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रद्दबातल ठरवला आहे.




तसेच आधीच्या चौकशी समितीने दोषी ठरवलेले लिलावदार, मंदिर कर्मचारी, विश्वस्त, शासकीय अधिकारी-कर्मचारी आदी १६ दोषींवर तुळजापूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तरी मा. न्यायालयाच्या या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी आणि या प्रकरणी दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल न केल्यास अवमान याचिका दाखल करणार, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड संघटक श्री. सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत केली. या प्रसंगी हिंदु विधीज्ञ परिषदेचे संस्थापक सदस्य अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. किशोर गंगणे, अधिवक्ता शिरीष कुलकर्णी आणि हिंदु जनजागृती समितीचे धाराशिव जिल्हा समन्वयक श्री. राजन बुणगे हेही उपस्थित होते.

श्री. सुनील घनवट पुढे म्हणाले, ''आई तुळजाभवानीच्या कृपेने गेली ९ वर्षे न्यायालयीन लढा देणार्या हिंदु विधीज्ञ परिषद आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले आहे.

देशभरातील कोट्यवधी देवीभक्तांना आनंद आणि दिलासा देणारा हा निर्णय आहे. या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक दर्जाच्या वरिष्ठ अधिकार्यांच्या देखरेखीखाली चालू ठेवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. देवनिधी लुटणार्या भ्रष्टाचार्यांना शिक्षा होईपर्यंत आम्ही या प्रकरणाचा पाठपुरावा करू.''

या प्रकरणात हिंदु जनजागृती समितीच्या वतीने उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठासमोर बाजू मांडणारे हिंदु विधीज्ञ परिषदेचे अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी म्हणाले, ''भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणांनी दोषींना पाठीशी न घालता तात्काळ त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. श्री तुळजाभवानीदेवी मंदिराला पूर्णवेळ जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी मुख्य प्रशासक म्हणून नेमावा; मंदिर समितीकडे आजही स्वतःची घटना अथवा नियमावली नाही, ती त्वरित बनवण्यात यावी; मंदिर परिसरात 'सीसीटिव्ही' कॅमेर्यांची संख्या वाढवावी आणि त्याचे फुटेज कायमस्वरूपी जतन करून ठेवावे; मंदिर परिसराचे सुरक्षा परीक्षण दरवर्षी करावे; मंदिरात जमा होणारे दान स्वरूपातील धन, सोने-चांदी याचे परीक्षण दरवर्षी लेखा परीक्षकांकडून करावे, अशा महत्त्वाच्या मागण्या आम्ही शासनाकडे केल्या आहेत.''

याउपरही प्रशासनाने कारवाई करण्यास दिरंगाई केल्यास आम्हाला उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याच्या प्रकरणी अवमान याचिका दाखल करावी लागेल, असा इशाराही अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी यांनी दिला.

# शेतकऱ्याकडून २ हजारांची लाच घेतांना महावितरणच्या तंत्रज्ञाला रंगेहात पकडले

लातूर : शेतकऱ्याच्या विहिरीवर शेती पंपाला विद्युत कनेक्शन देण्यासाठी तीन हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना महावितरणच्या बेलकुंड (ता. औसा) उपकेंद्रातील एका तंत्रज्ञाला (वर्ग ३) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने शनिवारी (दि. १८) दुपारी रंगेहाथ पकडल्याची घटना औसा शहराजवळील तुळजापूर टी पॉईंटजवळ घडली.




औसा येथील एका शेतकऱ्याला त्यांच्या विहिरीवर विद्युत पंप बसविण्यासाठी महावितरणकडून कनेक्शन हवे होते. यासाठी शेतकऱ्याने आरोपी सतीश उत्तमराव कांबळे (वय ३८, महावितरण तंत्रज्ञ, बेलकुंड शाखा, ता. औसा, रा. हंगरगा ता. निलंगा, जि. लातूर) याच्याकडे कागदपत्रांची पूर्तता केली. कनेक्शन देण्यासाठी शेतकऱ्याने सतीश कांबळे याला १ डिसेंबर २०२३ रोजी फोन पे द्वारे १३ हजार रुपये लाच म्हणून पाठविले. त्यानंतर ६ डिसेंबर २०२३ रोजीही फोन पे द्वारेच आणखी २ हजार रुपये पाठविले. सुमारे १५ हजार रुपये लाच घेऊनही सतीश कांबळे याने शेतकऱ्याला विद्युत कनेक्शन दिले नाही. यामुळे पुन्हा सदर शेतकऱ्याने विद्युत कनेक्शन देण्याची विनंती सतीश कांबळे याच्याकडे केली. त्यावेळी कांबळे याने सदर शेतकऱ्याला पुन्हा ३ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. ही गोष्ट शेतकऱ्याला खटकली. त्याने लातूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधला. तडजोडीअंती दोन हजार रुपये देण्याचे शेतकऱ्याने मान्य केले. ते दोन हजार रुपये स्वीकारण्यास सतीश कांबळे हा औसा शहराजवळील तुळजापूर टी-पॉईंटजवळ आला. त्याने शेतकऱ्याकडून एका हॉटेलमध्ये दोन हजार रुपयांची लाच शनिवारी (दि.१८) दुपारी पावणे तीन वाजेच्या सुमारास स्वीकारली. लाच स्वीकारताच सापळा लावून बसलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आरोपी सतीश कांबळे याला लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले. याप्रकरणी आरोपी सतीश कांबळे याच्या विरोधात औसा पोलीस ठाण्यात कलम ७,७ अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास औसा पोलीस करीत आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक संतोष बर्गे यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, अन्वर मुजावर पोलीस हेड कॉन्स्टेबल फारूक दामटे, भीमराव आलुरे, श्याम गिरी, शिवशंकर कच्छवे, कॉन्स्टेबल संदीप जाधव, मंगेश कोंडरे, दीपक कलवले, गजानन जाधव, संतोष क्षीरसागर यांनी ही कामगिरी बजावली.

## करबुडव्या बुट व्यापाऱ्याच्या घरात सापडले घबाड



नवी दिल्ली : आयकर विभागाने शनिवारी बूट बनविणा-या व्यावसायिकांवर मोठी कारवाई केली. आग्रा आणि दिल्लीसह उत्तर प्रदेशातील दोन जिल्ह्यांमध्ये व्यावसायिकांच्या घरावर आयकर विभागाने छापे टाकले. या छापेमारी दरम्यान ४० कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बूट व्यापारी कर चुकवत असल्याची माहिती आयकर विभागाला मिळाली होती.

## हरित पालखी सोहळयासाठी...

(पान १ वरून) उपयोग पालखीदरम्यान करण्यात यावा, असे निर्देश दिवसे यांनी दिले.

आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित कर्मचा-यांचे प्रशिक्षण घेऊन याबाबत आदर्श कार्यपद्धती तयार करावी. वारक-यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी. शहरातील स्वच्छता आणि आरोग्य क्षेत्रात काम करणा-या स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात यावी. त्यासाठी शहरातील तज्ज्ञ डॉक्टरांची बैठक घेऊन त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येईल, असे जिल्हाधिका-यांनी सांगितले.

**पालखी सोहळ्यात शौचालयांची सोय**

पालखी सोहळ्यात स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात येणार असून, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार ५००, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासाठी १ हजार आणि संत सोपान महाराज पालखी सोहळ्यासाठी २०० शौचालयांची व्यवस्था करण्यात येणार आहे. यामुळे वारक-यांची सोय होणार आहे, असेही सांगण्यात आले.

**आरोग्याचीही काळजी**

पंढरीच्या वारीदरम्यान पालखी सोहळ्यात १४० रुग्णवाहिका आणि ५७ रुग्णवाहिका पथक, ११२ वैद्यकीय अधिकारी, ३३६ आरोग्य अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी २०० टँकरची व्यवस्था करण्यात येणार आहे, असेही जिल्हाधिकारी दिवसे यांनी सांगितले.

# मुंबई घाटकोपर होर्डिंग्ज अपघातातील मृतात्म्यांना लातूरात श्रद्धांजली

लातूर : मुंबई घाटकोपर होर्डिंग्ज कोसळल्यानंतर १४ हुन अधिक जणांना आपला जिव गमवावा लागला तर अजुनही शोध बचावकार्य सुरु आहे. रचनेच्या मर्यादेपेक्षा अधिक क्षमतेच्या रचनेचे हे होर्डिंग्ज घातक ठरल्यामुळे राज्यात सर्वत्र हळहळ व्यक्त होत असुन लातूर येथे शहिद अहमदखान पठाण कृती समितीच्या वतिने शहरातील मुख्य बाजारपेठ गंजगोलाई येथे उभा असलेल्या एलईडी युनिपोल जवळ या घटनेतील मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.



भौगोलिक दृष्ट्या पठारावर असलेल्या लातूर ला वाऱ्याचा वेग ताशी ७८ किलोमीटर इतका अंदाज आहे तर वादळीवा-यासह मुसळधार पाऊसाचा अंदाज लावता येत नाही असे हवामान खात्याकडून समजते. लातूर महानगरपालिकेने निविदा मागवून होर्डिंग्ज व युनिपोल चा कोणताही कायदा नसताना निविदा भरल्या व शहरात २७ युनिपोल उभा केले. हे युनिपोल लोखंड धातुपासुन बनवण्यात आले असुन प्रत्येकी एका युनिपोल चे वजन २००० किलो आहे. यांची रचना तोकड्या नटबोल्टवर करण्यात आली आहे तर जमिनीपासून तिस फुटापेक्षा जास्त उंच आहेत. वादळीवा-याचा वेग अनियंत्रित झाला तर हे युनिपोल उन्मळून पडु शकतात असे मत शहिद अहमदखान पठाण कृती समितीचे सर्फराज सय्यद यांनी सांगितले आहे तर हे घातक ठरु शकणारे युनिपोल तात्काळ हटवण्यात यावे असेही त्यांनी यावेळी सांगितले आहे.यावेळी लातूर लोकसभा चे अपक्ष उमेदवार उमेश कांबळे, वंचित बहुजन आघाडी शहराध्यक्ष सचिन गायकवाड, समितीचे सय्यद सरफराज, इस्माईल शेख, तोसिफ शेख, सय्यद परवेझ, सय्यद सलीम, शादुल शेख, इजहार, साबेर, नोमान शेख, बिलाल शेख, सोहेल शेख, आदिल पठाण, अरबाज भाई यांच्यासह कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## महाराष्ट्रात मान्सून सहा ...

(पान १ वरून) केरळमध्ये ३१ मे रोजी दाखल होणार असल्याचेही विभागाने जाहीर केले आहे. त्यामुळे आता राज्यात मॉन्सून कधी बरसेल, याची उत्सुकता वाढली आहे, या पार्श्वभूमीवर विभागातील अधिका-यांनी माहिती दिली.

अंदमान आणि केरळमध्ये मॉन्सून कधी पोहोचेल, याचा अंदाज हवामान विभागातर्फे दिला जातो. मात्र तो राज्यात कधी पोहोचेल याचा अंदाज विभाग जाहीर करत नाही. मॉन्सूनची उत्तरेकडे होणा-या प्रगतीच्या सरासरी तारखा ठरल्या आहेत. त्यानुसार गोव्यात पाच जूनला दाखल होऊन उत्तरेकडे वाटचाल करत सहा जूनला तळकोकणात राज्यातील पहिली सलामी देतो. त्यानंतर पुण्यापर्यंतचा प्रवास सात जूनपर्यंत पूर्ण करतो.

यंदा मान्सून दाखल होत असताना कोणतेही चक्रीवादळ बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात निर्माण झालेले नाही. त्यामुळे मान्सूनच्या प्रवासाची सुरुवात कोणत्याही अडथळ्याशिवाय झाली आहे. त्यातून मॉन्सूनचा सरासरीप्रमाणे प्रवास होईल, अशी अपेक्षाही अधिका-यांनी व्यक्त केली. भारतीय हवामान विभाग २००५ पासून मॉन्सून केरळमध्ये दाखल होण्याची तारीख जाहीर करत आहे.

त्यासाठी सांख्यिकी पद्धतीचे प्रारूप विकसित करण्यात आले आहे. त्या आधारावर चार दिवस पुढे-मागे मान्सून केरळमध्ये दाखल होईल, असे सांगण्यात आले.

# विज्ञान व अध्यात्माच्या समन्वयातून विश्वशांती निर्माण होण्याचा संदेश जगभर पोहचविला-विश्वशांतीदूत प्रा.डॉ.विश्वनाथ कराड

लातूर : भारतीय तत्वज्ञान हे त्याग, भक्ती, आपुलकी आणि सदभावना यावर आधारित आहे. परंतु दुर्दैवाने जगभरात उच्च प्रगत शैक्षणिक प्रणालीमुळे या पैलूला बगल दिली गेली आहे. ११ सप्टेंबर १८९३ रोजी जागतिक धर्म संसदेत भारताचे महान पुत्र स्वामी विवेकानंद यांनी बोललेले भविष्यसूचक शब्द केवळ विज्ञान आणि धर्म/अध्यात्म यांचे एकत्रिकरणच मानवजातीत सुसंवाद आणून शांती निर्माण करेल असे प्रतिपादन एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख विश्वशांतीदूत प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांनी केले.



तत्वज्ञ संत श्री. ज्ञानेश्वर महाराज व तत्वज्ञ संत श्री. तुकाराम महाराज यांचे तत्वज्ञान, युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयाचा व विश्वशांतीचा संदेश यशस्वीरित्या जगभर पोहचवून एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख विश्वशांतीदूत प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ यूके आणि अमेरिका या देशाचा यशस्वी दौरा पुर्ण करुन नुकतेच मायदेशी परतले. अमेरिकेतील, उटाह राज्यातील ब्रिगहॅम यंग युनिव्हर्सिटीतर्फे (बीवाययू) शिक्षण आणि मानवतेच्या दीर्घकाळ समर्पित सेवेसाठी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना मानद डी. लिट. पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे. या शिष्टमंडळात एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. राहुल वि. कराड, कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण, डॉ. महेश थोरवे व अधिष्ठाता प्रा. मिलिंद पात्रे उपस्थित होते.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथील संत श्री. गोपाळबुवा महाराज मंदिर परिसरात होतन असलेल्या अखंड हरीनाम सप्ताह सोहळयात सहभागी होण्यासाठी विश्वशांतीदूत प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड आले असता शुक्रवारी दुपारी काल्याच्या किर्तनानंतर पत्रकारांशी संवाद साधताना वरील प्रतिपादन केले. यावेळी हभप तुळशीराम कराड, काशीराम कराड व एमआयटी एडिटी युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड म्हणाले, शिक्षणात वैश्विक मूल्याधिष्ठीत शिक्षणाचा अंतर्भाव करणे गरजेचे आहे. त्यातूनच वसुधैव कुटुम्बकम आणि विश्व बंधुत्वाचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. मन, बुद्धी,

(पान ३ वर)

# लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या पर्वाला दिमाखदार सुरुवात

## स्पर्धेत ३०० संघ, पाच हजारांपेक्षा अधिक खेळाडू सहभागी




लातूर (प्रतिनिधी) – ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने सुरु करण्यात आलेल्या लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप : ग्रामीण–टी १० च्या तिस–या पर्वाला शनिवारपासून (दि.१८) दिमाखदार सुरुवात झाली असून तालुकास्तरीय स्पर्धेत लातूर जिल्हा व लोहा–कंधार (जि. नांदेड) तालुक्यातील सुमारे ३०० पेक्षा अधिक संघ सहभागी झाले आहेत. उत्साही वातावरणात सुरू झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत आता कोण बाजी मारणार, याची उत्सुकता आहे.

लोकनेते, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप संयोजन समितीच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून दि. १८ मे ते दि. २१ मे दरम्यान तालुकास्तरीय आणि दि. २२ मे ते दि. २४ मे दरम्यान जिल्हास्तरीय सामने होणार आहेत.

तालुकास्तरीय स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून यात आजपर्यंत लातूर तालुक्यातील ४२, लातूर शहर ३२, उदगीर ४१, अहमदपूर १५, चाकूर २२, देवणी २०, जळकोट १८, रेणापूर २३, शिरुर अनंतपाळ २६, औसा ३२, निलंगा १४ तर लोहा – कंधार तालुक्यातील १३ असे जवळपास ३०० संघ व पाच हजारांपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवून स्पर्धेत मोठी चूरस निर्माण केली आहे. तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या संघास ५१ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार असून या संघाला जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. तसेच तालुकास्तरावर उपविजेता ठरणा–या संघास ३१ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे.

तरुण पिढीला मैदानी खेळांकडे वळवून चांगले खेळाडू घडविण्यासाठी 'लोकनेते विलासराव देशमुख क्रिकेट चॅम्पियनशिप : ग्रामीण– टी १०' ही स्पर्धा घेण्यात येत असून या स्पर्धेच्या तिस–या पर्वालाही क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंसाठी पोषक वातावरण तयार करुन क्रीडा संस्कृती रुजविणे आणि तिचा विस्तार करणे, हा आमचा प्रयत्न आहे असे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सांगितले.

# उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंदर यांचा सत्कार



लातूर : श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड येथील शिक्षण सहसंचाल डॉ. किरणकुमार बोंदर यांचा शाल, महात्मा बसवेश्वर प्रतिमा, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. दीपक चाटे आणि संदीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाची स्थापना सं १९७० ला झाली असून आज ५४ वर्ष झालेले आहे. हे महाविद्यालय मराठवाड्यातील कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल, समाजकार्य आणि बीसीए अशा एकूण सहा शाखा चालवणारे आहे.

समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि गणित असे एकूण सहा पदव्युत्तर विभाग असून तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि भूगोल या विषयाचे संशोधन केंद्रे आहे. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयांमध्ये स्थापनेपासून ते आजतागायत महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला, असा मी घडलो.... प्रबोधनपर कार्यक्रम अशा सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. क्रीडा, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना आणि कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशाचा एक उत्कृष्ट नागरिक बनविण्याचा प्रयत्न केला जातो असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. किरणकुमार बोंदर म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे मराठवाड्यातील शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध असलेले महाविद्यालय आहे.

या महाविद्यालयाला नॅकने अ दर्जा प्रदान केलेला आहे. येणाऱ्या काळामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संस्था पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी केंद्रित असून यामध्ये विद्यार्थ्याला अधिकाधिक कौशल्ययुक्त निर्माण करून त्याने स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्नशील असण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या धोरणामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रात्यक्षिक ज्ञानाला अधिक महत्त्व दिले असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश मोदी यांनी परिश्रम घेतले.

# विज्ञान व अध्यात्माच्या समन्वयातून विश्वशांती...

(पान २ वरून) आत्मा आणि शरीर हे निसर्ग तत्व आहे. आज शरीर आणि बुद्धी यावर सखोल संशोधन होत आहे. परंतू आत्मा आणि मनाच्या शिक्षणाचा विचार झालेला दिसत नाही. जगात शांती नांदायची असेल तर अध्यात्माबरोबरच मन आणि आत्म्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

जगात शांती नांदायची असेल तर अध्यात्माबरोबरच मन आणि आत्माचा अभ्यास होणे गरजचे आहे. तसेच मनाचे रसायनशास्त्र आजपर्यंत कोणालाही कळलेले नाही. त्यासाठी आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये मनाच्या शास्त्राचा समावेश करावा. असे सांगून प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांनी लंडन येथील ऑक्सफोर्डमध्ये आयोजित 'मूल्याधिष्ठित शिक्षण पद्धती' यावरील गोलमेज परिषदेत आज जगामध्ये दहशतवाद, घातपात, रक्तपात, जातीय व धर्मवादामुळे अशांतता व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. हे कमी करण्यासाठी शिक्षण पद्धतीत वैश्विक मूल्याधिष्ठीत शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. त्यातुनच विश्वशांतीचे वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे बोलून दाखविले.

अमेरिकेतील आर्ट इन्स्टीट्यूट ऑफ शिकागो येथील फुलरटन हॉल ज्या ठिकाणी स्वामी विवेकानंद यांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी जागतिक धर्म संसदेदरम्यान जे ऐतिहासिक भाषण केले त्या ठिकाणी विश्वधर्मी प्रा.डॉ. कराड यांनी भारताचे थोर सुपुत्र स्वामी विवेकानंद यांचा पुतळा बसविण्याचा संकल्प घेतला. गोलमेज या परिषदेमध्ये वॉर्विक येथील लॉर्ड टेलर, थोर शिक्षणतज्ञ डॉ. नील हॉक्स, लंडन येथील तथागत गौतम बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणारे विचारवंत डॉ. गौतम चक्रवर्ती, लंडन स्थित इंडियन हाय कमिशनच्या डॉ. निधी चौधरी, केंब्रिज विद्यापीठाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. ब्रायन फोर्ड, स्वित्झरलँड येथील डॉ. जेफ्री क्लेमेंटस हे सहभागी झाले होते. ब्रिगहॅम यंग युनिव्हर्सिटीतर्फे (बीवाययू) शिक्षण आणि मानवतेच्या दीर्घकाळ समर्पित सेवेसाठी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांना देण्यात आलेल्या मानद डी.लिट. पदवी प्रदान समारंभास विविध देशातील २५ हजाराहून अधिक नागरीक उपस्थित होते अशी माहिती देण्यात आली.

# लातूरातील बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणजे थोर स्वातंत्र्य सेनानी जीवनधर शहरकर गुरुजी-प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई

लातूर : लातूरातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, तत्वनिष्ठ पत्रकार, आदर्श शिक्षक, समाजवादी विचार असलेले उत्तुंग व्यक्तिमत्व, हाडाचे आदर्श शिक्षक, गांधी विचाराचे कृतिशील व्यक्तिमत्व आणि ज्येष्ठ नागरिक जीवनधर शहरकर गुरुजी यांचे नुकतेच वृद्धापकाळाने वयाच्या ९७व्या वर्षी निधन झाले. त्यांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.



जयंती उत्सव समिती व कार्यालय, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनधर शहरकर गुरुजी यांचा सामूहिक श्रद्धांजली कार्यक्रम प्राचार्य कक्षामध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते आपल्या भावना व्यक्त करताना बोलत होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. संजय गवई म्हणाले की, जिवनधर शहरकर गुरुजी यांच्या निधनाचे वृत्त म्हणजे शहरातील पत्रकार, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मोठी पोकळी आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठी आपण सर्वांनी त्यांच्या विचाराचा आदर्श घेऊन त्याप्रमाणे आपले वर्तन ठेवावे अशी भावना सुद्धा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. बाळासाहेब गोडबोले आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की, त्यांच्या निधनाने लातूर शहर हे पोरके झाले आहे. ते एक चालते बोलते आचार आणि विचारांमध्ये समानता असलेले आदर्श व्यक्तिमत्व होते. त्यांनी संपूर्ण आयुष्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचारांची प्रत्यक्ष व्यवहारात अंमलबजावणी केली. आजच्या युवकाला आदर्शवत ठरेल असे त्यांचे निरोगी आणि निरामय आरोग्य होते. आज त्यांच्या जीवनशैलीची नव्या पिढीने आदर्श घेऊन त्या पद्धतीने वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी केले व सर्वांच्या सामूहिक श्रद्धांजलीने हा कार्यक्रम संपला.

# हरित क्षेत्र वाढविण्यासाठी लातूर जिल्ह्यात राबविला जाणार 'माझा जिल्हा, हरित जिल्हा' उपक्रम

## वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होणाऱ्या संस्था, ग्रामपंचायतींचा होणार सन्मान

## शासकीय व खासगी कर्मचारी, पत्रकार यांचाही प्रजासत्ताक दिनी होणार सत्कार

लातूर : जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी यंदा शासन, प्रशासन आणि लोकांच्या सहभागातून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली जाणार आहे. यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'माझा जिल्हा, हरित जिल्हा उपक्रमात सामाजिक संस्था, ग्रामपंचायती, शासकीय अधिकारी, कर्मचारी, खासगी आस्थापना, पत्रकार, नागरिक यांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले आहे.

वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धनाचे ध्येय समोर ठेवून त्यादृष्टीने विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. यामध्ये ३० मे पर्यंत गाव आणि शहरी पातळीवर वृक्ष लागवडीसाठी जागा निश्चित करून खड्डे खोदण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच ३ जूनपर्यंत शाळा, ग्रामपंचायत, नगरपरिषद कार्यालय, तलाठी कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र आणि अंगणवाडी याठिकाणी बॉक्समध्ये विविध वृक्षांच्या बिया जमा करून 'सीड बँक' तयार करावी. ५ जून रोजी पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड करण्यासाठी शाळेत अथवा पाणी व जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणी सीड बँकेतील बियांपासून रोपवाटिका तयार करावी. तसेच याठिकाणी किमान दहा झाडे लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

'शाळेत पहिले पाऊल, वृक्ष लावून' हा उपक्रम १५ जून रोजी राबविण्यात यावा. या अंतर्गत शाळेत नवीन प्रवेश घेणाऱ्या मुलांच्या हस्ते व त्यांच्या नावाने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. २१ जून रोजी वटपौर्णिमानिमित्त गावात किमान वडाची १० झाडे महिलांच्या हस्ते लावावीत. तसेच २६ जून रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त प्रत्येक गावात किमान १५० रोपांची लागवड करावी. १ जुलै ते ७ जुलै या कालावधीत कृषि सप्ताह अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये किमान २०० रोपांची लागवड शेतकऱ्यांच्या बांधावर करावी, तसेच शेतामध्ये बांबू किंवा फळबाग लागवड करण्याचे, तसेच ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये लोकसंख्येइतकी झाडे लावण्याचे नियोजन करावे. गुरुपौर्णीमेनिमित २१ जुलै रोजी गुरूच्या नावाने प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, ग्रामपंचायत कर्मचारी आणि इतर कर्मचारी यांच्या हस्ते प्रत्येकी एका झाडाची लागवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

श्रावण मास आरंभानिमित्त ५ ऑगस्ट रोजी प्रत्येक गावात ५ बेलाची झाडे लावणे, १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रत्येक गावात वृक्ष लागवडीचे आयोजन करणे, १९ ऑगस्ट रोजी नारळी पौर्णीमेला प्रत्येक ग्रामपंचायतीने किमान ५० नारळाची झाडे लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच रक्षाबंधन निमित्त भावाने बहिणीस भेटवस्तूसोबत तिच्या आवडीचे एक रोप भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच २५ ऑगस्ट रोजी महा वृक्ष लागवड दिन आयोजित करून सर्व शासकीय विभागांनी वृक्ष लागवड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### वृक्ष लागवड मोहिमेत उत्कृष्ट करणाऱ्या संस्था, व्यक्तींचा होणार सन्मान

**वृक्ष लागवड मोहिमेमध्ये विविध सामाजिक संस्था, ग्रामपंचायती, अधिकारी, पत्रकार, नागरिक यांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या मोहिमेंतर्गत वृक्ष लागवड आणि वृक्ष संगोपनामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या प्रत्येक तालुक्यातील ३ ग्रामपंचायती, १ सामाजिक संस्था, तसेच जिल्हास्तरावर ३ ग्रामपंचायती, १ सामाजिक संस्था यांना प्रजासत्ताक दिनी मान्यवरांच्या हस्ते विशेष परितोषिक दिले जाईल. तसेच वृक्ष लागवड व संवर्धनबाबत विशेष जनजागृती, प्रसिद्धी व वार्तांकन करणाऱ्या निवडक पत्रकारांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. वृक्ष लागवड मोहिमेत विशेष कामगिरी करणारे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, व्यक्ती यांचाही गौरव करण्यात येणार आहे.**

# थकबाकीधारकांवर मनपाची धडक कार्यवाही

## कार्यवाही करताच ०८ मालमत्ताधारकांनी केला थकीत कराचा भरणा



लातूर : मालमत्ता कर हाच लातूर महापालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. त्या दृष्टीने सालसन २०२३–२४ वर्षात मनपा तर्फे वसुली मोहिम राबविण्यात आली, ज्याअंतर्गत नागरिकांना विविध सवलती देण्यात आल्या व वेळोवेळी कर भरण्याचे आवाहन देखील करण्यात आले. त्यास बहुतांश मालमत्ताधारकांनी प्रतिसाद देऊन आपल्या कराचा भरणा करून मनपास सहकार्य केले.

परंतु, काही मालमत्ताधारकाकडे कर थकीत आहे. थकबाकिदार यांना थकीत रकमेवर दरमहा व्याज सुद्धा लागत आहे. थकीत मालमत्ताकराचा भरणा करण्याबाबत वेळोवेळी मागणी बीले,नोटीस देऊनही कराचा भरणा न केल्याने क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी, अंतर्गत येणा–या कार्यक्षेत्रामध्ये थकित मालमत्ताधाकराच्या वसुलीसाठी दि.१७.०५.२०२४ रोजी एकूण १६ वाणिज्य आस्थापनावर कार्यवाही करण्यात आली. सदर मालमत्तापैकी पेट्रोल पंप कार्यालय, बॅक व्यवस्थापक कार्यालय, लाकडी गोडाऊन तसेच इतर वाणिज्य आस्थापनावर कार्यवाही करताच यामधील ०८ मालमत्ताधारकांनी आपल्याकडील थकीत कराचा भरणा केला आहे.

या पुढेही थकीत कराच्या वसूलीसाठी थकबाकी मालमत्ताधारकांवर जप्तीची कार्यवाही करण्यात येणार असून थकबाकीधारक मालमत्ताधारकांनी आपल्याकडील थकीत मालमत्ताकर व पाणी पट्टी कराचा भरणा करून जप्तीसारखी होणारी कटू कार्यवाही टाळावी व मनपा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी नागरिकांना केले आहे.

# लातूरात खाजगी बसने दोन मोटारसायकल चालकास चिरडले

लातूर : दि १८ मे ओव्हरटेक करण्याच्या गडबडीत खाजगी बस चालकाने स्वामी विवेकानंद पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि १८ मे रोजी सकाळी ०७ वाजण्याच्या सुमारास दोन मोटारसायकल चालकास धडक देत खाजगी बसच्या समोरील टायरखाली एका मोटारसायकलला चिरडले तर दुसऱ्या मोटारसायकलला समोरील बाजूने ठोकरले यात एकास डोकाला गंभीर मार लागला असुन रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेले रामदास पंढरी ताकपडे वय २६ राहणार मोळवण ता अहमदपूर सध्या हरिभाऊ नगर लातूर हे आपली राञपाळीचे काम संपवून डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दुध घेण्यासाठी एम एच २४ ए आर ५१०६ होंडा कंपनिची मोटारसायकल थांबले असताना पुणे– अहमदपूर– लोहा– कंधार जाणारी समोर राजधानी नाव लिहलेली एम एच ०४ जी एफ ६६६९ खाजगी बस दुसर्या खाजगी बसला ओव्हरटेक करत या मोटारसायकलला धडक देऊन चिरडली तर समोरच चौकात वळण घेऊन बौद्ध नगर येथे वळत असलेले महादेव कांबळे वय अंदाजे ५५ हे त्यांच्या मोटारसायकल क्रमांक एम एच २४ ए सी ९०६३ वरुन जात असताना या बसने ठोकरले आहे. यात महादेव कांबळे यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याचे स्थानिकांकडून समजते तर त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे. यावेळी मोठ्या संख्येने नागरीकांनी गर्दी केली होती.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे-जिल्हाधिकारी

## रेणापूर मध्यम प्रकल्पातील गाळ उपसा कामाची पाहणी

## काटगाव येथील जलयुक्त शिवार अभियानातील कामाला भेट

लातूर : तलावातील सुपीक गाळ आपल्या शेतात टाकून जमीन अधिक सुपीक बनविण्याची संधी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानामुळे शेतकऱ्यांना मिळत आहे. तसेच तलावातील गाळ उपसला गेल्याने अधिकचा पाणीसाठा निर्माण होवून सिंचनासाठी मदत होणार असल्याने शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने या अभियानात सहभागी होवून आपल्या परिसरातील तलावातील गाळ उपसा करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी केले.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानातून रेणापूर मध्यम प्रकल्पातील गाळ उपसा करण्यात येत असून या कामाची जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी पाहणी केली. औसा–रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल



कांबळे यांच्यासह स्थानिक शेतकरी यावेळी उपस्थित होते.

सध्या जिल्ह्यातील तलावांमधील गाळ उपसा करण्याला प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त प्रकल्पांमधील गाळ उपसा करण्याचे नियोजन असून या कामामध्ये शेतकऱ्यांचा सहभाग आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी आपल्या आजूबाजूच्या तलावातील गाळ उपसा करण्यासाठी जलसंधारण विभागाकडे मागणी नोंदवावी. पावसाळ्यापूर्वी तलावातील गाळ उपसा झाल्यास तलावाच्या साठवण क्षमतेत वाढ होणार असून त्या पाण्याचा शेतीसाठी लाभ होईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. रेणापूर मध्यम प्रकल्पातून आजूबाजूच्या ७ ते ८ गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून गाळ उपसा सुरु केला आहे. आतापर्यंत सुमारे २ लाख २० घनमीटर गाळ उपसा करण्यात आला आहे. या तलावातील जास्तीत जास्त गाळ उपसा करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**काटगाव येथे जलयुक्त शिवार अभियानाच्या कामाला भेट**

लातूर तालुक्यातील काटगाव येथे जलयुक्त शिवार अभियानातून करण्यात आलेल्या नाला खोलीकरण व रुंदीकरण कामाला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी भेट देवून पाहणी केली. याठिकाणी जवळपास ४ किलोमीटर लांबीच्या नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात आले असून नाल्यातील अंदाजे ३८ हजार घनमीटर गाळ उपसण्यात आला आहे. त्यामुळे ३८० सहस्त्र घनमीटर अतिरिक्त पाणीसाठा होवून या पाण्याचा फायदा आजूबाजूच्या ५०–६० विहिरी, विंधन विहिरींना होणार आहे.

ग्रामपंचायत, तसेच स्वयंसेवी संस्थांनी या नाल्याच्या दोन्ही बाजूला मृद व जलसंधारणासाठी वृक्ष लागवड करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी केले. लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, नायब तहसीलदार गणेश सरोदे, महादेव गोमारे यांच्यासह स्थानिक शेतकरी यावेळी उपस्थित होते. टाकळी येथे आर्ट ऑफ लिव्हिंगमार्फत करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीचीही जिल्हाधिकारी यांनी पाहणी केली.

# रिपाई नेते चंद्रकांत चिकटे व ॲड.अतिश चिकटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा



लातूर : रिपाईचे राज्य सचिव चंद्रकांतदादा चिकटे व विद्रोही ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष ॲड.अतिश चिकटे यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर शहरातील कचरा स्वच्छ करणाऱ्या स्वच्छता कामगार महिलांना विलास नगर, नांदेड रोड लातूर येथे शेकडो महिलांना साडी वाटप करण्यात आले. दि.१६ मे रोजी चंद्रकांतदादा चिकटे व विद्रोही ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष ॲड.अतिश चिकटे यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या अनेक वर्षापासून कचरा स्वच्छ करण्याचं काम ज्या महिला करतात त्यांच्याप्रती सामाजिक बांधिलकी दाखवत वाढदिवसावर व्यर्थ खर्च न करता साडीवाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष लातूर शहराचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून आनंद लांडगे, डॉ. सुधाकर गुळवे, अशोक कांबळे, किशोर कांबळे, सुरेश काळे, आयोध्या उपाध्ये माजी नगरसेवक, कमलाकर उबाळे, मोहन दिवटे, किसन समुद्रे, भानदास काळे, मातंग गारुडी तरुण मंडळाच्या वतीने चंद्रकांत चिकटे व ॲड.आतिश चिकटे भव्य सत्कार करण्यात आला. लातूर शहरातील शेकडो महिलांना साड्या वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन श्याम काळे, रघु काळे, करण काळे, राम कसबे, गणेश काळे, विशाल काळे आकाश ससाणे, नितीन मोरे, नितीन कदम,कपिल गायकवाड, अतुल कदम, करण गायकवाड, बबलू सावळे आदींनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# शस्त्राचा धाक दाखवून विदेशी दारूचा ट्रक लुटणारे ०४ आरोपी ७२ लाख रुपयांच्या मुद्देमालसह ७२ तासातच जेरबंद




लातूर : याबाबत थोडक्यात माहिती अशी की दिनांक १२ मे रोजी मध्यरात्री नागपूर तुळजापूर महामार्गावरील आष्टा येथील टोलनाक्याजवळ दोन वाहनातून आलेल्या काही अज्ञात चोरट्यांनी शस्त्राचा धाक दाखवून विदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या कंपनीचा ट्रक मध्ये बसलेल्या चालक व हेल्पर इतर दोन इसमांना मारहाण करून लुटल्याची घटना घडली होती. ट्रक चालकाने दिलेल्या फिर्याद वरून पोलीस ठाणे चाकूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २३५/२०२४ कलम ३९५, ३४१, ५०६ भादवी व ४, २५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी घटनास्थळास भेट देऊन पाहणी केली व गुन्ह्याच्या तपासकामी स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस ठाणे चाकूर येथील पोलीस अधिकारी अमलदारांचे विविध पथके तयार करून त्यांना मार्गदर्शन व सूचना देऊन विविध ठिकाणी तात्काळ रवाना करण्यात आले. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने बीड, धाराशिव, सोलापूर व कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे तपास करून सदर पद्धतीचे गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस करून, तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्ह्यातील अज्ञात आरोपींना निष्पन्न करून त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरलेला विदेशी दारूचे ९०० बॉक्स व ट्रक असा एकूण ७२ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार रियाज सौदागर, राजेश कंचे, योगेश गायकवाड, प्रदीप स्वामी, राहुल कांबळे, रामहरी भोसले, मनोज खोसे, खुर्रम काझी, राहुल सोनकांबळे, साहेबराव हाके, दीनानाथ देवकते, रवी गोंदकर, तुराब पठाण, नितीन कटारे,मोहन सुरवसे, संतोष खांडेकर, चालक पोलिस अमलदार नकुल पाटील, सचिन मुंडे, प्रदीप चोपणे, चंद्रकांत केंद्रे, व्यंकट निटुरे, सायबर सेल चे सहाय्यक पोलीस निरीक्षक नलिनी गावडे, पोलिस अमलदार संतोष देवडे, गणेश साठे, शैलेश सुडे, केली आहे.

# पानगावसह १० गावात होतोय अशुध्द पाणीपुरवठा

रेणापूर – रेणापूर तालूक्यातील पानगाव सह १२ खेडीसाठी योजनेसाठी बारा गावात लोकांना शुध्द पाणी पुरवठा व्हावा नागरीकांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी पाथरवाडी येथे उभारण्यात आलेल्या जलशुद्धीकरण केंद्राच्या दुरुस्तीसाठी शासनाने ४ कोटी ९३ लाख ६३ हजार २०० रुपयांचा निधी मंजूर करुन अद्यापही बारा गावांना अशुध्द पाणीपुरवठा होत आहे.

रेणापुर तालुक्यातील भंडारवाडी येथे रेणा मध्यम प्रकल्प लोकनेते गोपिनाथ मुंडे यांनी २० वर्षा पूर्वी उभारला या प्रकल्पातील पाणी शुध्द होऊन पानगाव सह बारा गावांना पुरवठा करण्यासाठी पाथरवाडी येथे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले. हे जलशुद्धीकरण केंद्र उभारून तब्बल २४ वर्षे उलटल्याने आतुन मशीन खराब झाल्यामुळे दुरुस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या वतीने ४ कोटी ९३ लाख ६३ हजार २०० रुपये दुरुस्ती रक्कम मंजूर करण्यात आली याला प्रशासकीय मान्यता ३ ऑगष्ट २०२२ लाख देण्यात आली. ताजीक मान्यता १२ में २०२२ लाख देण्यात आली ही योजना पुर्ण होण्याचा दिनांक २ फेब्रुवारी २०२४ देण्यात आली होती.

जलशुद्धीकरण केंद्राच्या दुरुस्तीच्या कामामध्ये अशुद्ध पाण्याची ३०० मी मि व्यासाची उद्धारण नलिका, शुद्ध पाण्याची उद्धरण मालिका २५० मिमी व्यासाची, शुद्ध पाण्याची गुरुत्व नलिका २०० मी मी व्यासाची एच.डी.पी.ई. पाईप, शुद्ध पाण्याची गुरुत्व नलिका २५० ते १८० मि मी व्यासाची एच डी पी ई पाईप, शुद्ध पाण्याची गुरुत्व नलिका १६० मी मी व्यासाची एच डी पि पाईप, शुद्ध पाण्याची उद्धरण मालिकेची दुरुस्ती करणे, अशुद्ध पाण्याची पंप सामग्री, शुद्ध पाण्याची पंप सामग्री ५.००८.ल.ली. जलशुद्धीकरण केंद्र नूतनीकरण (यांत्रिकी कामे ), अशुद्ध व शुद्ध पाणी पपिंग मशिनरी यांत्रिकी कामे, योजनेची चाचणी आदींची कामे ४ कोटी ९३ लाख ६३ हजार २०० रुपयाची करुन पानगाव सह बारा वाडी खेड्यांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये पानगाव मुदव, खरोळा, माणूस मारवाडी, घणसरगाव, आदी गावांचा समावेश आहे.

पाथरवाडी येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या दुरुस्तीचा कार्यारंभ आदेश डिसेंबर २०२२ रोजी देण्यात आला असून, ही योजना २ फेब्रुवारी २०२४ रोजी पूर्ण करून बारा गावांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याचं नियोजन करण्यात आलं होतं परंतु या योजनेच्या दुरुस्तीच्या कामाला आदेश देऊन १७ महिने संपूनही ही अद्यापही या जलशुद्धीकरण केंद्राच्या दुरुस्तीचे काम पूर्ण न झाल्यामुळे सद्या पानगाव सह १२ अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. योजनेच्या कामाला सतरा महिने उलटूनही आणखीन किती दिवस लागणार आणि लोकांना शुद्ध पाणी कधी मिळणार याची मात्र चर्चा गाव सुरू आहे.

**येत्या ८ ते १० दिवसांत शुद्ध पाणीपुरवठा सुरु करु**

**पानगाव, माणुसमारवाडी, मुरढव, घनसरगाव, खरोळा या गावांना रेणापूर म ध्यम प्रकल्पा शिवाय पाणी पुरवठ्याचा दुसरा पर्याय नसल्याने या गावांना पाणी पुरवठा करत जल जिवन मिशन अंतर्गतची पाईपलाईन व जल शुध्दीकरणाची कामे करावी लागली. यामुळे काम पुर्ण करण्यास वेळ लागला आहे. पाथरवाडी येथिल जल शुध्दिकरण केंद्रातील थोडी कामे राहीली आहेत. आठ ते दहा दिवसात कामे पुर्ण करुन शंभर टक्के शुध्द पाणी पुरवठा करण्यात येईल.**

**- दत्तात्रय केंद्रे,** आदीत्य कंस्ट्रक्शन्स, मुरुड

# श्री भगवान गौरीशंकर मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना दिननिमित्त कव्हेकरांच्याहस्ते महाअभिषेक

लातूर : शहरातील मार्केट यार्ड परिसरामध्ये १९९३ मध्ये श्री भगवान गौरीशंकर मंदिराची प्रतिष्ठापना करण्यात आली. या मंदिराचा प्रतिष्ठापना दिन २२ मे २०२४ रोजी साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी तथा श्री भगवान गौरीशंकर मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते सकाळी ८.०० वा महाअभिषेक करण्यात येणार आहे.



यावेळी स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला श्री भगवान गौरीशंकर चॅरिटेबल ट्रस्ट लातूरचे उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, सचिव ललीतभाई शहा, कोषाध्यक्ष रमेश बियाणी, सदस्य निळकंठराव पवार, बाळासाहेब पाटील, सुभाषअप्पा सुलगुडले, संभाजीराव पाटील, दिनकर पाटील मसलगेकर, प्रदीप सोनवणे, अजितसिंह पाटील कव्हेकर यांची उपस्थित राहणार आहे. तसेच श्री भगवान गौरीशंकर व्यवस्थापन मंदिर कमिटीचे अध्यक्ष दिनकर पाटील मसलगेकर, उपाध्यक्ष माधवराव गोलावार, ॲड गंगाधर हामणे, बाबूअप्पा सोलापूरे, सचिव गोवर्धनदास भंडारी, सहसचिव ब्रिजमोहन मालू, नंदकिशोर सोनी, रमेश फटाले, कोषाध्यक्ष सुभाषअप्पा सुलगुडले, सदस्य नागनाथ मामडगे, अंकुशराव आवस्कर, रामभाऊ माळगे, डॉ. आत्माराम झिरमिरे, गोविंद पारीख, धोंडीराम सोमवंशी, रामराव हांडे, जुगलकिशोर पल्लोड, बाळासाहेब मोहिते, शिवशरण थंबा, सल्लागार प्रदीप सोनवणे, बाबासाहेब कोरे, दिलीपराव पाटील, राजकुमार शेटे, आदी मान्यवरांची उपस्थित राहणार आहे.

# अनाधिकृत होर्डिंग वर शनिवारीही मनपाची कार्यवाही

लातूर : घाटकोपर मुंबई येथे सोसाटयाचा वारा व वादळामुळे होर्डिंग कोसळुन अपघात होऊन जिवित हानी झालेली आहे. सदयस्थितीत कधीही वारा व वादळी वा-यामुळे / पावसामुळे/विजेमुळे होर्डिग्ज/फलक पडून अपघातांची घटना घडू शकते. त्यादृष्टीने लातूर शहरातील अनाधिकृत होर्डीग्जवर मनपाव्दारे कार्यवाही करण्यात येत आहे.

त्याप्रमाणे आज दि. १८/०५/२०२४ रोजी ३ होर्डीग्ज ज्याची साइज ३० बाय २५ व १० बाय २० निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. व लहान बॅनर ८ निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. तसेच क्षेत्रिय कार्यालयामार्फत आज २ (दोन) गुन्हा नोंद करण्यात आले आहेत. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशानुसार व उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय अधिकारी कलीम शेख व मालमत्ता व्यवस्थापक रवि कांबळे आणि त्यांच्या पथकांनी सदर कार्यवाही केली

त्याअनुषंगाने लातूर शहरातील ज्या खाजगी मालमत्तांवर होर्डीग्ज लावण्यात आलेले आहेत, सदर होर्डीग्ज हे रविवार पर्यंत संपूर्ण स्ट्रक्चरसहीत काढून घेण्यात यावे. सदर होर्डीग्ज सोमवारी निदर्शनास आल्यास सदर मालमत्ता धारकांवर व एजन्सी धारकांवर क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत गुन्हा नोंद करण्यात येणार आहे. तरी ज्या खाजगी ईमारतीवर अनधिकृत होर्डीग्ज आहेत, त्या तात्काळ काढून घेवून मनपास सहकार्य करावे. सदरील होर्डीग्ज मुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना किंवा अपघात होऊन जिवीत अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधीत अभिकरण (एजन्सी) / मालमत्ता धारक यांना सर्वस्वी जबाबदार धरणेत येईल व संबंधीत अभिकरण (एजन्सी) / मालमत्ता धारक यांचेवर सदोष मनुष्यकवधाचा गुन्हा दाखल करुन संबंधीत अभिकरण (एजन्सी/ मालमत्ताधारक) कार्यवाहीस पात्र राहतील. याप्रमाणे सुचना निर्गमित करण्यांत येत आहेत. सदर कार्यवाही रविवारी अशीच चालू राहणार आहे.

# शिकाऊ व पक्क्या परवाना चाचणीकरिता २० मे रोजी ‘अपॉइंटमेंट’ घेतलेल्या तारखेत बदल

मुंबई : परिवहन विभागाचे संकेतस्थळ https://parivahan.gov.in द्वारे अनुज्ञप्ती (Licence) संबंधीची सर्वच कामे ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

त्यासाठी कार्यालयात येणाऱ्या नागरीकांना शिकाऊ परवाना चाचणी व पक्का परवाना वाहन चालक चाचणी देण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अपॉइंटमेंट घेणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने २० मे २०२४ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) या कार्यालयात शिकाऊ परवाना चाचणी व पक्का परवाना वाहन चालक चाचणीकरीता घेतलेल्या अपॉइंटमेंटच्या तारखेत लोकसभा निवडणूक मतदानासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर केल्यामुळे बदल करण्यात आला आहे.

आता ही चाचणी २२ मे २०२४ रोजी होणार आहे. ज्या उमेदवारांची पक्के परवाण्याकरिता वाहन चालक चाचणी २० मे २०२४ रोजी होती, ती दि.२१ ते २४ मे २०२४ दरम्यानच्या कालावधीमध्ये बदलण्यात (Re-schedule करण्यात) आली आहे. तसेच त्याबाबत प्रणालीमध्ये नमुद भ्रमणध्वनी क्रमांकावर प्रणालीकडून संदेश (मेसेज/SMS) देखील पाठविण्यात आले आहेत.

तरी कार्यालयात येणाऱ्या सर्व उमेदवार, मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे प्रतिनिधी यांनी २० मे रोजीची अपॉइंटमेंट घेतली असल्यास, त्यासर्वांनी चाचणीसाठी कार्यालयास या दिवशी भेट न देता बदल केलेल्या (Re-scheduled) दिनांकांस भेट द्यावी. संबंधित कागदपत्रांसह बदल केलेल्या दिनांकास उमेदवारांनी कार्यालयात चाचणीकरिता उपस्थित राहावे, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंबलबाजवणीतून कौशल्याधिष्ठीत विद्यार्थी निर्माण होणार–आदिनाथ सांगवे

## नवनिर्वाचित संस्था कार्यकारणी मंडळ पदाधिकारी सन्मान सोहळा आणि संस्था व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची सुसंवाद बैठक

लातूर : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे कौशल्याधिष्ठित विद्यार्थी घडवून आत्मनिर्भर आणि विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करणारे आहे असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे नूतन अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांनी केले. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सभागृहामध्ये नवनिर्वाचित संस्था कार्यकारणी मंडळ पदाधिकारी सन्मान सोहळा आणि संस्था व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची सुसंवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते.



यावेळी विचारमंचावर श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), सचिव माधवराव पाटील (टाकळीकर), सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज येरटे, संचालक बाबुराव तरगुडे, संचालक प्रभूप्पा पटणे, संचालक ॲड. काशिनाथ साखरे, संचालक प्रा. गुरुलिंग धाराशिवे, कुमार स्वामी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. काशिनाथ राजे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रजनन करण्यात आले. संगीत विभागाच्यावतीने प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि प्रा. सरस्वती बोरगावकर यांनी शारदास्तवन आणि स्वागत गीत सादर केले. नवनिर्वाचित सर्व संस्था संचालकांचे महाविद्यालयाच्यावतीने शाल, महात्मा बसवेश्वर प्रतिमा, स्मृतिचिन्ह आणि पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, जगभरातल्या कोणत्याही समाजामध्ये शिक्षक, प्राध्यापक आणि महिला भगिनी यांचा सन्मान होतो. भारतीय संस्कृती ही मातृदेवो भव, पितृ देवो भव आणि गुरुदेवो भाव अशी आहे. आपल्या संस्कृतीमध्ये गुरुजनांचा आदर केला जातो त्यामुळेच देशाचा सर्वांगीण विकास झाला आहे. शिक्षण हे पवित्र असे कार्य आहे. नवीन शैक्षणिक धोरणात प्राध्यापक आणि विद्यार्थी यांना केंद्रभूत म्हणून देशाच्या विकासाचा आराखडा आखलेला आहे. विद्यार्थी, पालक आणि प्राध्यापक यांच्यात सुसंवाद वाढून शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करता येते. असेही ते म्हणाले.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना माधवराव पाटील टाकळीकर यांनी महात्मा बसवेश्वरांच्या वचनांचा आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग केला गेला पाहिजे. तत्त्व आणि व्यवहार यांच्यामध्ये साम्य असले पाहिजे. तरच महात्मा बसवेश्वरांच्या विचारातील स्वप्नातील समाज निर्माण होऊ शकतो असे ते म्हणाले. या कार्यक्रमात सुनीलप्पा मिटकरी, विजयकुमार रेवडकर, राजेश्वरजी बुके आणि डॉ. काशीनाथ राजे यांनी आपल्या मनोगतातून कार्य संस्कृती रुजवण्याची गरज वर्तविली. यावेळी उपस्थित सर्व नवनिर्वाचित संस्था पदाधिकाऱ्यांनी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ग्रंथसंपदेच्या ग्रंथ प्रदर्शनाला भेट सुद्धा दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपआपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत कक्कया समाजाचा महाविकास आघाडीच्या अनिल देसाई यांना पाठिंबा



धारावी : धारावीतील संत कक्कया विकास संस्थेचा इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल देसाई यांना जाहीर पाठिंबा असल्याबाबत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. सदर बैठक ही श्री गणेश विद्या मंदिर येथे आयोजित करण्यात आली होती.

यावेळी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती ,विविध सामाजिक, शैक्षणिक संस्था तसेच सर्व घटक पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवसेनेचे विभागप्रमुख महेश सावंत,विभागसंघटक विठ्ठल पवार,नगरसेवक वसंत नकाशे,यांच्यासह समाजातील समाजसेवक दिलीप कटके, अध्यक्ष शिवलिंग व्हटकर,माजी शाखाप्रमुख उत्तम शिंदे,दत्ता खंदारे, संदीप कटके,महादेव शिंदे,उनलेश गजाकोश,,महादेव नारायणे,निलेश साळुंके,सतीश कटके, माधुरी गायकवाड, नीता सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंट्‌र्स, बी–२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक – शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200